**प्रेस नोट दिनांक ०८/०६/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**विभक्त राहत असलेल्या पत्नीकडुन लहान मुलीस आइस्क्रीम खाण्याचे बहाण्याने घेवुन गेलेल्या पतीचा तात्काळ शोध मुलीस आईच्या ताब्यात सुखरूप परत.**

दि. ०५.०६.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित कासेवाडी पोलीस चौकीस रात्रपाळी कर्तव्यावर पो.ना.६५६८ भोसले डयुटी अंमलदार म्हणुन हजर असताना, रात्रौ ००.२० वाजण्याचे दरम्यान महिला,वय २२ वर्षे रा.भवानी पेठ पुणे यांनी येवून कळविले की, तिचे पती याने त्यांची लहान मुलगी,वय-०२ वर्षे, हिला पाच मिनिटांमध्ये आईस्क्रिम चारून पुन्हा परत घेवून येतो असे सांगुन निघुन गेले ते परत आलेले नाहीत. सदरबाबत नमुद कर्मचारी यांनी चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, सदर महिला त्यांचे पतीपासून विभक्त राहत असून सद्या आईकडे कासेवाडी पुणे येथे मुलीसोबत राहत असलेबाबत सांगितले.

नमुद कर्मचारी पो.ना. भोसले यांनी कासेवाडी बीट मार्शलवरील कर्मचारी पोना शेंडगे व पोशि वाळकोळी यांना बोलावुन घेवून त्यांचेसह कासेवाडी, सेव्हनलव्हज चौक, नेहरू रोड या भागात शोध घेत असताना धम्मपाल संघ चौक या ठिकाणी एक इसम त्याचे लहान मुलीसह उभा असल्याचे दिसले. नमुद कर्मचारी यांनी त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने सांगितले की, माझी मुलगी कल्याणी हिस आईस्क्रिम खाण्याकरीता बायकोकडून घेवून आलो असल्याचे सांगितले. तसेच त्यांचेमध्ये व त्यांचे पत्नी प्रांपचिक वादावरून ते ऐकमेकांनासोबत राहत नसल्याचे सांगितले. नमुद इसमांस त्याचे मुलीसह कासेवाडी चौकीस आणुन मुलीबाबत योग्य ती खातरजमा करून तिचे आईच्या ताब्यात सुखरूप देण्यात आलेली आहे.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

